SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000
www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
NATIONAL SERVICE SCHEME
दूरध्वनी 0231-2609176
ई-मेल आयडी-nss@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ जा.क./ शिवाजी वि./रा.से.यो./ई-मेलद्वारे/1007

दिनांक 06/01/2024

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर

विषय : राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन – 2024 मध्ये संचलन (परेड) करिता स्वयंसेवक म्हणून झालेल्या निवडीबाबत.....

नाव : प्रविण विठ्ठल जमदाडे (7249390914)

मा. महोदय/ महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना व्दारे वेळोवेळी विविध कार्यक्रम, उपक्रम तथा शिबीराचे आयोजन करण्यात येते. प्रतिवर्षी राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने राष्ट्रीय तसेच राज्य स्तरावरील प्रजासत्ताक दिन संचलन मध्ये राष्ट्रीय सेवा योजनाच्या निवडक स्वयंसेवक, स्वयंसेविका यांना संधी देणेत येते. दिनांक 26 जानेवारी, 2024 रोजी राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे पार पडणार आहे. याठिकाणी होणा–या राज्यस्तरीय संचलन (परेड) करिता आपल्या महाविद्यालयातील वरीलप्रमाणे नमूद विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी यांची सहभागी शिबीरार्थी म्हणून निवड झालेबद्दल विद्यापीठाच्या वतीने आपले **मनःपूर्वक अभिनंदन.**

दिनांक 26 जानेवारी, 2024 रोजी होणा–या संचलन साठी निवड झालेल्या स्वयंसेवकाकरिता दि. 17 ते 26 जानेवारी, 2024 या 10 दिवसांच्या कालावधीत स्पोर्टस् कॉम्पलेक्स विद्यानगरी, कलिना, मुंबई येथे राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन – 2024 तालिम शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. सदर शिबीरास दिनांक 17 जानेवारी, 2024 रोजी सकाळी मुंबई येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. तरी सदर निवड झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस दि. 17 जानेवारी, 2024 रोजी मुंबई येथे पाठविण्यात यावे. सोबत जोडलेल्या पत्रानुसार विद्यार्थ्यांस आवश्यक असणा–या सर्व वस्तू सोबत घेणेबाबत सूचित करण्यात यावे. सोबत जोडण्यात आलेल्या फॉर्मची एक प्रत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे शिबीरार्थीना शिबीरस्थळी जाणे–येणे करीता होणारा प्रवास व परेडकरीता आवश्यक असणारे पांढरे पॅन्ट शर्ट, व शूज इ. खर्च संबंधित महाविद्यालयाने आपल्या राष्ट्रीय सेवा योजना अनुदानातून करावा ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. टी. एम. चौगले)
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : संबंधित पत्र व फॉर्म


प्राचार्य
डॉ. आर. आर. कुंभार